अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

आज हुतात्मा दिन

मल्लप्पा धनशेट्टी | जगन्नाथ शिंदे | अब्दुल रसूल कुर्बान हुसेन | श्रीकिसन सारडा

स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वीच सोलापूर शहराने १९३० मध्ये ९, १० आणि ११ मे असे ३ दिवसांचे स्वातंत्र्य अनुभवले. स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिश सरकारशी संघर्ष करणारे मल्लप्पा धनशेट्टी, किसन सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन या सोलापूरच्या चार हुतात्म्यांना १२ जानेवारी १९३१ला येरवडा तुरुंगात गोऱ्या राजवटीकडून फाशी देण्यात आली. हा दिवस सोलापुरात 'हुतात्मा दिन' म्हणून पाळला जातो.

चार हुतात्म्यांच्या स्मृतीला अभिवादन.

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.१२ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ९४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

रेशन दुकानदारांच्या मनमानीला दणका अन्नधान्य खात्याने दाखवला दंडुका

- शहरातील दोन रेशन दुकाने निलंबित
- अपहार धान्याची रक्कम शासनाच्या तिजोरीत भरण्याचे आदेश

सुराज्य/सोलापूर

स्वस्त धान्य दुकानातून शासनामार्फत दिले जणारे धान्य गरीब, मध्यमवर्गीय आणि कष्टकऱ्यांपर्यंत पोहलेच पाहिजे, असा राज्य सरकारचा दंडक असतानाही रेशन दुकानदारांची मनमानी अजूनही पहायला मिळते. सोलापुरात या धान्याचा काळाबाजार झाल्याने अन्नधान्य वितरण विभाग कडक पाऊल उचलले आहे. शहरातील रास्त भाव धान्य दुकान क्रमांक १६ आणि दुकान क्रमांक ६२ यामध्ये शासकीय धान्याचा काळाबाजार झाल्याचे वृत्त दैनिक सुराज्यने दिले होते. या वृत्ताची दखल घेऊन दुकानाची तपासणी केली असता दुकानात ६१.३० क्विंटल गहू आणि ९१.६६ क्विंटल तांदळाची तफावत आढळून आली होती. तपासणी नंतर दुकानदारांना नोटीस दिली असता नोटीसीला उत्तर समाधानकारक आले नाही. त्यामुळे अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांनी या दुकानांचा परवाना सहा महिन्यासाठी निलंबित केला आहे. तर अपहार केलेली रक्कम शासनाच्या तिजोरीत भरण्याचे आदेश शिंदे यांनी दिले आहेत.

सुराज्यचा दणका

अशोक चौकातील रेशन दुकानाची तपासणी

अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांना आज अहवाल सादर होणार

सुराज्य/सोलापूर

अशोक चौकातील दुकानातून धान्याचा काळाबाजार जात असल्याचे वृत्त दैनिक सुराज्यने गुरुवारच्या अंकामध्ये प्रसारित केले होते. या वृत्ताची दखल घेऊन अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी क विभागाचे परिमंडल अधिकारी अनिल नवळी आणि पुरवठा निरीक्षक राजेश वसपुरे दोघांच्या माध्यमातून दुकानाची तपासणी केली. या दुकानांमध्ये तपासणीच्या वेळी अनेक तपावत आढळून आल्याच्या आल्याची माहिती मिळाली असून या सर्व गोष्टींचा अहवाल आज अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांना सादर केला जाणार आहे.

या दुकानातून शासकीय धान्य काळाबाजारात जात असल्याचे निदर्शनास आले होते. या संदर्भात अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी या दुकानदारांच्या विरोधात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर गुरुवारी स.क.परिमंडल अधिकारी अनिल नवळी आणि पुरवठा निरीक्षक राजेश वसपुरे यांनी थेट दुकान गाठले दुकानातील सर्व कागदपत्रांची, धान्याचा साठा, रजिस्टर या गोष्टींची या गोष्टींची तपासणी केली. वामध्ये तफावत आढळून आल्याची माहिती मिळाली आहे. मात्र या गोष्टींचा अहवाल आज अन्नधान्य वितरण अधिकारी यांना परिमंडल अधिकारी सादर करणार आहेत. या तपासणीवेळी दुकानातील पात्र लाभार्थ्यांचा देखील जबाब नोंदवण्यात आले अमूल चौकशी करण्यात आली आहे तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आल्याचे समजते.

शासन नियमानुसार वैयक्तिक नावावर दुकान असल्यास मदतनीस अथवा व्यवस्थापक ठेवता येत नाही कायद्याने गुन्हा आहे. मात्र सदरचे दुकान एकाच्या नावे आहे. दुसरा दुकान चालवत असल्याचा प्रकारदेखील यावेळी निदर्शनास आला आहे.

प्राप्त तक्रारीनुसार दोन अधिकाऱ्यांकडून दुकानाची तपासणी केली आहे. तपासणी अहवाल आज आपल्याला प्राप्त झाल्यानंतर दुकानदारावर कारवाई केली जाईल.

- सुमित शिंदे, अन्नधान्य वितरण अधिकारी

भारतरत्न दलित राष्ट्रसेवा संघ संचलित रेशन दुकान क्रमांक ६२ हे दुकान अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांची कोणती परवानगी न घेता सदर बाजार जागेत स्थलांतर केले होते. दुकानआठवड्यापासून बंद होते. विनापरवाना दुकान चालवल्यामुळे तपासणी केली असता दुकानात ६१.३० क्विंटल गहू आणि ९१.६६ क्विंटल तांदळाची तफावत आढळून आली होती. दुकानदारांना नोटीस दिली असता नोटीसीला उत्तर समाधानकारक आले नाही त्यामुळे अन्नधान्य वितरण अधिकारी शिंदे यांनी सुधारता दुकानाचा परवाना सहा महिन्यासाठी निलंबित केला आहे. तसेच गहू आणि तांदळाची तफावत आढळून आली ६१.३० क्विंटल गहू बाजारभावाप्रमाणे २४.७५ रुपया प्रमाणे एक लाख ५१ हजार ७१८ रूपये आणि ५१.६६ क्विंटल गहू बाजारप्रमाणे ३१.२० रुपया प्रमाणे दोन लाख ८५ हजार ९७९ रुपये असे एकूण चार लाख ३७ हजार ६९७ रुपये एवढी रक्कम शासनाच्या तिजोरीत भरण्याचे आदेश शिंदे यांनी दिले.

कमल सुरेश आठवले यांच्या मालकीचे क १६ या दुकानाबाबत तक्रार आली होती. या दुकानातून रेशनच्या धान्य काळा बाजारात जात असल्याचा व्हिडिओ देखील अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांकडे आला होता या व्हिडिओचा आधार घेऊन या दुकानाची तपासणी करण्यात आली होती. तपासणीमध्ये दुकानात अनेक त्रुटी आढळून आल्या होत्या. धान्याची नोंद फलकावर दिसून आली नाही, अन्नसुरक्षा अंत्योदय लाभार्थ्यांची यादी दर्शनी भागावर लावली नाही, दुकानातील लाभार्थ्यांचे कौटुंबिक रजिस्टर ठेवले नाही, दक्षता समितीचा बोर्ड लावलेला नाही, वाटण्यात आलेले धान्य दुकानातील एकत्रित गहू तांदळाचा पुस्तकाचा साठा पाहता गव्हामध्ये १.१६ तर ५२.५२ क्विंटल तांदूळ असे एकूण ५३.६८ क्विंटल ची धान्याची तपावत आढळून आली होती.

वैयक्तिक दुकान मंजूर असताना दुकान तपासणीच्या वेळी दुकानदार उपस्थित असणे आवश्यक असताना दत्ता चव्हाण ही व्यक्ती दुकान चालवत असल्याचे निदर्शनास आले. दुकानातून धान्याचा अपहार होत असलेला व्हिडिओच्या क्लिप चा आधार घेत सदरच्या दुकानदारावर कारवाई करत दुकान निलंबित केले आहे. या दुकानांमध्ये तांदळाचा ५२ क्विंटल तांदळाचा अपार झाल्याचा निदर्शनास आले होते. या धान्याची बाजारभावा ३१.२० रुपयाप्रमाणे १ लाख ६३ हजार ८६२ रुपये आणि १.१६ क्विंटल गव्हाचे बाजार मूल्य प्रमाणे २०.८१ रूपया प्रमाणे दोन हजार ८७१ या प्रमाणे एकूण एक लाख ६६ लाख ७३३ रुपये शासकीय तिजोरीत जमा करण्याचे आदेश अन्नधान्य उत्पन्न अधिकारी सुमित शिंदे यांनी काढले आहेत तोपर्यंत सहा महिन्यांसाठी ही दुकाने निलंबित केले आहेत.

श्रीराम प्रतिष्ठापना अन् शिवजयंतीलाही मिळणार आनंदाचा शिधा

दसरा, दिवाळी, गुडीपाडवा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या नंतर आता अयोध्येतील श्रीराम मंदिरात होणारा प्रभू रामाचा प्राणप्रतिष्ठा सोहळा व शिवजयंती या दोन उत्सवांच्या निमित्ताने राज्यातील शिधापत्रिका धारकांना आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सोलापूर शहरातील ३१४ रास्त भाव दुकानातून हा आनंदाचा शिधा असलेले १ लाख २१ हजार ९९१ कीट तर जिल्ह्यातील १५५८ रास्त भाव धान्य दुकानांतून ३ लाख ८० हजार १८० कीट मिळणार असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दिली. गुरूवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. त्यात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. याच बैठकीत रेशनकार्ड धारकांना ही खुशखबर देण्यात आली. हा आनंदाचा शिधा राज्य सरकारच्या वतीने गुढी पाडवा, गणेशोत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती व दिवाळी अशा सणांनिमित्त रेशन कार्डधारकांना दिला जातो. यात एक किलो रवा, एक किलो चना डाळ, एक किलो साखर, एक किलो तेल, पोहा आणि मैदा याचा सम ावेश असतो. अवघ्या शंभर रुपयांत या ६ वस्तू गरजूंना दिल्या होत्या आता हा शिधा आणखी दोन दिवस दिला जाणार आहे. श्री राम मंदिर सोहळ्याच्या निमित्ताने आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवानिमित्ताने हा आनंदाचा शिधा दिला जाणार आहे. जिल्हापुरवठा विभागाकडून पुरवठ्याचे नियोजन चालू आहे. शहर जिल्ह्यासाठी साडेपाच लाख किटची मागणी करण्यात आली आहे.

कुर्डूवाडीत पशुधन विकास डॉक्टरची कामाच्या ठिकाणीच आत्महत्या

सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डूवाडी येथील टेंभुर्णी रस्त्यावर असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्यामध्ये कर्तव्यावर असणाऱ्या पशुधन विकास अधिकाऱ्याने दवाखान्याच्या कार्यालयातील छताला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने जिल्हा परिषदेच्या प्रशासनात खळबळ उडाली आहे. ही घटना बुधवारी दुपारी १ ते दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास दरम्यान घडली.

तणावातून त्यांनी जीवन संपवल्याची चर्चा पशुधन विभागात होत आहे. डॉ.विश्वनाथ जगाडे (वय-३९, परभणी, सध्या कुर्डुवाडी) असे आत्महत्या केलेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे. जगाडे हे मूळचे परभणी येथील असून, कुर्डुवाडी येथे गेल्या दोन वर्षापासून पशुधन विभागात पशुधन विकास अधिकारी म्हणून कार्यरत होते. नागरिकांनी ही खबर पोलिसांना दिली. पोलिसांनी नोंद आकस्मित म्हणून केली आहे. पोलिसांनी पंचनामा केला.त्यानंतर त्यांचा मृतदेह कुर्डूवाडीतील ग्रामीण रुग्णालयात आणला. आत्महत्येबाबत मात्र नेमके कारण समजू शकले नाही.

गुरूवारी सकाळी सोलापूर जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुधन विकास अधिकारी डॉ.नवनाथ नरळे यांनी भेट देऊन त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन केले. शासनाची मदत असेल ती लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. कुर्डुवाडी येथील ग्रामीण रूग्णालयात शवविच्छेदन करुन गुरूवारी सकाळी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. त्यांच्यावर मूळ गावी परभणीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अधिकाऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती त्वरित देण्याचे सांगण्यात येत असते मात्र या दरम्यान शासनाच्या प, इंटरनेट व आदी अडचणीला समोरे जावे लागते व नागरिकांचा काम करण्यासाठी दबाव असल्यामुळे काम करताना मानसिक त्रास होत असतो. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे.

मुलाचे अपहरण करुन जबरी चोरीसह, खंडणी मागणाऱ्या चौघा आरोपींना अटक

सुराज्य/सोलापूर

स्थानिक व्यापाऱ्याच्या मुलाचं अपहरण करून जबरी चोरीसह खंडणी मागितल्याच्या गुन्ह्यात गुन्हे शाखेने एका चौकडीला गजाआड केली आहे. सर्व्हेश बाहेती जीमसाठी अवंतीनगर येथे ॲक्सेस मोटार सायकलवरून जात असताना चौघा अनोळखी इसमांनी, कारंबा नाका येथील ब्रिजजवळील गतीरोधकावर मोटार सायकल आडवी घालून, त्याचे अपहरण केले. हा थरारक प्रकार दि. २७ डिसेंबर रोजी पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास घडला.

फोन-पे चा वापर करून, त्याच्याकडून २० हजार रूपये काढून घेतले होते. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्याकडे दाखल गुन्ह्यात चौघांना गजाआड केले. या गुन्ह्याची पार्श्वभूमी अशी की, सम्राट चौक येथील रहिवासी व्यापारी बाहेती यांचा मुलगा सर्व्हेश, जीमसाठी जात असताना चौघा अनोळखी इसमांनी त्याचे अपहरण करून त्याच्या मोबाईलमधील फोन-पेवरून २० हजार रुपयांची रक्कम काढून येतली.त्यानंतर त्याच्या नातेवाईकास धमकी देऊन खंडणीची रक्कम मागितली होती.

त्यानंतर चौकडीने सर्व्हेश बाहेती यास सोडून दिले होते. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होता. याबाबत दि. ९ जानेवारी रोजी सपोनि संदीप पाटील यांना मिळालेल्या माहितीनुसार एका काळ्या रंगाची नंबर प्लेट नसलेली वेस्पा मोटार सायकल व सिल्वर रंगाची (एम.एच.१३ ए.सी.०७२४) स्प्लेंडर मोटार सायकलसह, जुना पुना नाका येथील नाल्याखालील रोडवर थांबले असता सपोनि संदीप पाटील व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी त्यांना ताब्यात घेतले.

ही कामगिरी पोलीस उप-आयुक्त डॉ. दीपाली काळे, सहायक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे, यांच्या मार्गदर्शनाखाली, संदीप पाटील, विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे,सुभाष मुंढे, वसीम शेख, गायकवाड, जेनुरे, सायबरकडील अविनाश पाटील,प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड, चालक नेताजी गुंड यांनी पार पाडली.

अशी आहेत आरोपींची नावे...

०४ संशयीतांकडे चौकशी करता, प्रणव शाम ठाकूरदास, (वय-२६, व्यवसाय मेडीकल दुकानात नोकरी), रोहन श्याम वनस्कर (वय-२१, शास्त्रीनगर, महादेव चौक), अजय अनिल कलागते (वय-२२, लतादेवीनगर, स्वागतनगर रोड, कुमठा नाका), रोहित अंकुश काटकर (वय-२४, धोबीघाट, विकासनगर, होटगी रोड) अशी त्यांची नावे असल्याचे चौकशीत पुढे आले आहे. त्यांच्याकडे कौशल्यपूर्वक तपास केला असता, त्यांनी हा गुन्हा केला असल्याची कबुली दिली आहे.

पैशाच्या वादातून पेट्रोल ओतून पेटविलेल्या महिलेचा मृत्यू

सोलापूर : उसने दिलेल्या पैशाच्या वादातून अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिल्याने ४० वर्षीय महिला भाजून गंभीर जखमी झाल्या होत्या. त्या सोलापूरातील शासकीय रुग्णालयात उपचार येताना गुरुवारी सकाळी मयत झाल्या. ही घटना भेंड (माढा) येथे दि. ४ जानेवारी रोजी सायंकाळच्या सुमारास घडली होती. याप्रकरणी कुर्डूवाडीच्या पोलिसांनी दोन महिलेसह तिघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

तिघांवर खुनाचा गुन्हा

शिवलीबाई समिंदर काळे (वय-४०, भेंड) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. घटनेनंतर त्यांना गंभीर भाजलेल्या अवस्थेत सोलापुरातील खाजगी रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर दि. १० जानेवारी रोजी शासकीय रुग्णालयात महादेव (मुलगा) यांनी दाखल केले होते. शिवलीबाई काळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कुर्डूवाडीच्या पोलिसांनी त्यांची चुलत जाऊ मीना संजय काळे, दीपक पाटील आणि मंगल पवार (पडसाळी, माढा) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. आरोपी दीपक पाटील यांच्यासह तिघेजण गुरुवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारात भेंड येथे शिवलीबाई यांच्याकडे आले होते. पैशाच्या वादातून भांडण केले. त्यानंतर एकीने शोलेबाई यांना पकडले. दुसरीने सोबत आणलेल्या बाटलीतील पेट्रोल ओतून आग लावली. त्यानंतर दोघी दीपक पाटील यांच्या दुचाकीवरून पसार झाले. अशी नोंद पोलिसात झाली. तपास फौजदार वायमारे करीत आहेत.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

सकाळी थंडीत मी बाहेर पडत नसतो, असे म्हणायचे!

कल्याण
790-63-355

मुंबई
667-90-460

मदहोश झालेल्या शिंदे गटाची वाट अजूनही खडतरच

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

सभापती राहुल नार्वेकर यांनी निकाल दिल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथा शिंदे यांच्या गटामधून जल्लोष केला जात असला तरी पुढच्या वाटचालीतही शिंदे गटाची वाट खडतर असल्याचा निष्कर्ष समोर आला आहे. निवडणूक आयोगापाठोपाठ विधानसभा अध्यक्षांनी शिवसेनेतील फुटीवर मुख्यमंत्री शिंदे यांच्या बाजूने निकाल दिला असला तरी या निकालावर सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन होणार झाल्यास शिंदे यांच्यासमोरील आव्हान अद्यापही कायम असल्याचे घटनातज्ञ सांगतात.

शिवसेनेतील फुटीनंतर आमदारांच्या अपात्रतेवर नार्वेकर यांनी शिंदे यांच्यासह सर्वच आमदारांना पात्र ठरविले तसेच निवडणूक आयोगानंतर विधानसभा अध्यक्षांनी शिवसेना ही शिंदेंचीच असल्याचा निर्वाळा दिला. निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांच्या निकालांमुळे मुख्यमंत्री शिंदे यांना बळ मिळाले आहे. शिवसेना शिंदे यांचीच या निवडणूक आयोग आणि विधानसभा अध्यक्षांच्या निर्वाळ्यामुळे भाजपही अधिक आनंदी आहे. कारण उद्धव ठाकरे यांचे खच्चीकरण करून शिवसेनेची सूत्रे शिंदे यांच्याकडे आहेत, हे बिंबविण्याचा सातत्याने प्रयत्न भाजपकडून होत आहे आणि सतत केलाही जाईल.

अपात्रतेची टांगती तलवार दूर झाली असली तरी मुख्यमंत्री शिंदे यांना पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयातील कायदेशीर प्रक्रियेतून जावे लागणार आहे. गेल्या वर्षी शिवसेनेच्या ठाकरे गटाने केलेल्या याचिकेवर न्यायालयाने शिंदे यांना अपात्र ठरविण्यास नकार दिला होता. कारण पक्षांतरबंदी कायद्यानुसार पात्र वा अपात्र ठरविण्याचा अधिकार हा विधानसभा अध्यक्षांचा असतो. अपात्रतेच्या अर्जावर विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या निकालाचे न्यायालयीन पुनर्विलोकन करता येते, असे निकाल यापूर्वी न्यायालयाने दिले आहेत. यानुसारच ठाकरे गटाने नार्वेकर यांच्या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचे जाहीर केले आहे. न्यायालयात विधानसभा अध्यक्षांच्या निकालावर पुनर्विलोकन होईल. आमदारांच्या अपात्रतेवर विधानसभा अध्यक्षांनी ठराविक कालमर्यादेत निर्णय द्यावा, असा आदेश न्यायालयाच्या घटनापीठाने दिला होता. यामुळे नार्वेकर यांच्या निकालाच्या विरोधात उच्च न्यायालयाऐवजी थेट सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता येऊ शकेल. फक्त सर्वोच्च न्यायालयात या याचिकेवरील सुनावणीला किती काळ लागेल यावर सारे अवलंबून असेल,असे घटनातज्ञांचे म्हणणे आहे.

सुट्टीनंतर न्यायालय पुन्हा सुरू होईल तेव्हा विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू झालेली असेल. ऑक्टोबरमध्ये राज्य विधानसभेची निवडणूक होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात कायद्याच्या कसोटीवर विधानसभा अध्यक्षांचा निकाल टिकणे अवघड असल्याचा अंदाज आल्यास कदाचित राज्यात लोकसभेबरोबरच विधानसभेच्या निवडणूक घेतल्या जाऊ शकतात, असे महायुतीच्या एका ज्येष्ठ नेत्याने सांगितले. अध्यक्षांचा निकाल हाती आलाा असला तरी मुख्यमंत्री शिंदे यांच्या डोक्यावरील टांगती तलवार अद्यापही दूर झालेली नाही. न्यायालयात पुन्हा काथ्याकूट होण्याची चिन्हे आहेत. सर्वोच्च न्यायालयात किती वेळ लागतो यावरच शिंदे यांचे भवितव्य अवलंबून आहे.

अंगावरून ट्रॅक्टर गेल्याने मजूर ठार

सोलापूर : ऊस तोडीचे काम चालू असताना रात्रीच्या सुमारास फडात झोपलेल्या मजुराच्या अंगावरून ट्रॅक्टर गेल्याने तो जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शेवते (पंढरपूर) येथे घडला.

रोहिदास किसन पवार (वय-५०, देऊळगा, बुलढाणा सध्या रा. देवडे) असे मयताचे नाव आहे. ते शेवते येथील भांगे यांच्या शेतात उसाच्या फडात झोपले होते. त्यावेळी (एम. एच.१३ - सी.एस.- ११५८) या क्रमांकाचा ट्रॅक्टर त्यांच्या अंगावरून गेल्याने ते मयत झाले. पोलिसांनी लक्ष्मण गजानन चव्हाण या ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार लेंगरे तपास करीत आहेत.